बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### नशामुक्त भारताच्या संकल्पासाठी जिल्हा परिषदेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची शपथ

## युवक, विद्यार्थी व नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा निर्धार

### कालापथक व पथनाट्यातून व्यसनांच्या दुष्परिणामांवर जनजागृती

**जालना । प्रतिनिधी**

नशामुक्त भारत अभियानाच्या माध्यमातून युवक, विद्यार्थी तसेच नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद जालना येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी 'नशामुक्त भारत' निर्माण करण्याची शपथ घेत व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी सक्रिय योगदान देण्याचा निर्धार केला.

जिल्हा परिषदेच्या स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल तसेच जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, जालना आणि जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या मंचावर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) राधाकिशन राऊत, सहाय्यक आयुक्त अनिता राठोड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी रमेश घोळवे, शिक्षणाधिकारी संगीता भागवत, कार्यकारी अभियंता सविता सलगर, उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, उपअभियंता संतोष साखरकर तसेच स्नेहल मोराळे यांची उपस्थिती होती.

व्यसन ही केवळ व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण समाजाची समस्या

यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यसनाधीनतेचे व्यक्तीच्या आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांवर मार्गदर्शन केले. अमली पदार्थ, तंबाखू, गुटखा, दारू यांसारख्या व्यसनांमुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्याचबरोबर व्यसनाधीन व्यक्तीच्या कुटुंबावर (पान २ वर)

## जालना येथे सप्टेंबरमध्ये राष्ट्रीय संत गोविंददेव गिरीजी यांची भागवत कथा

### कथेच्या जनसंपर्क कार्यालयाचे दत्ता महाराज गोंदीकर व विनायक महाराज फुलंब्रीकर यांच्या हस्ते उद्घाटन

**जालना - प्रतिनिधी**

भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समितीच्यावतीने जालन्यातील मंठा रोडवरील आईसाहेब लॉन्समध्ये २० ते २६ सप्टेंबरदरम्यान आयोध्यातील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास मथुराचे उपाध्यक्ष प. पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या वाणीतून भव्य श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.



या महोत्सवाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन रविवार दि. १६ ऑगस्ट रोजी संभाजीनगर प्रभागातील राजुरी कॉर्नरजवळ (भाजपा कार्यालयाच्या पाठीमागे) भक्तिमय वातावरणात ह. भ. प. भागवताचार्य दत्ता महाराज गोंदीकर आणि वे. शा. सं. विनायक महाराज फुलंब्रीकर यांच्या शुभहस्ते विधिवत पूजन करून करण्यात आले. यावेळी उद्घाटनपर आशीर्वाचनात गोंदेकर महाराज म्हणाले की, श्रीमद् भागवत कथा ही मानवाच्या आत्मिक कल्याणाचा आणि मोक्षाचा सर्वोत्तम मार्ग आहे. ज्याप्रमाणे राजा परीक्षिताने या कथेचे श्रवण करून आपल्या मोक्षाचे साधन केले, अगदी त्याचप्रमाणे प्रौष्ठपदी पर्वामध्ये जालनेकरांना पूज्यपाद गुरुदेव गोविंददेव गिरीजी महाराजांच्या अमृतवाणीतून कथेचा लाभ मिळणे हे परम आहे. हे आयोजन अत्यंत यशस्वी आणि निर्विघ्न पार पडो, असा आमचा शुभ आशीर्वाद आहे. विनायक महाराज म्हणाले की, श्रीमद् भागवत हे प्रत्यक्ष भगवान (पान २ वर)

## वाळू-गुटख्यासोबत गंभीर गुन्ह्यांवरही स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध वाळू तस्करी व प्रतिबंधित गुटख्याविरोधातील कारवाईसोबतच दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी व खून यांसारख्या गंभीर गुन्ह्यांच्या तपासातही कार्यवाही करण्यात आल्याचे स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) खुलासा केला आहे.

एलसीबीच्या खुलाशानुसार, जालना जिल्ह्यात अवैध वाळू तस्करी तसेच प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक व विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार संबंधितांविरुद्ध सातत्याने कारवाई करण्यात आली. मात्र, एलसीबीचे संपूर्ण लक्ष केवळ वाळू व गुटखा कारवाईवर असल्याचा दावा वस्तुस्थितीला धरून नसल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

उपलब्ध आकडेवारीनुसार, दरोड्याचे २ गुन्हे दाखल असून दोन्ही गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. या प्रकरणांत ११ आरोपींना अटक करण्यात आली. जबरी चोरीचे २६ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी २४ गुन्हे उघडकीस आले आहेत, तर ४८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. घरफोडीचे ७० गुन्हे दाखल असून २० गुन्ह्यांची उकल झाली असून ३६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे चोरीचे ६२४ गुन्हे दाखल असून ३०५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. या प्रकरणांत ३६१ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती खुलाशात देण्यात आली आहे. खुनाचे ३० गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी २८ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. त्यामुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या (पान २ वर)

## जालन्यात दोन तलवारींसह दोन तरुण जेरबंद

### *स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; २ हजार ५०० रुपयांचा शस्त्रसाठा जप्त, दोन्ही आरोपी सदर बाजार पोलिसांच्या ताब्यात*

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यां विरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली असून, दोन स्वतंत्र ठिकाणी कारवाई करत दोन तरुणांकडून दोन तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने मंगळवारी (दि. १८ ऑगस्ट) ही कारवाई केली. जप्त करण्यात आलेल्या दोन्ही तलवारींची एकूण किंमत २ हजार ५०० रुपये असल्याची



माहिती पोलिसांनी दिली.

या कारवाईमुळे शहरात विनापरवाना घातक शस्त्रे बाळगणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर शोधमोहीम**

जालना जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी पथक तयार करून अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या.

या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरातील विविध भागांत माहिती संकलित करून संशयितांचा शोध घेत होते. (पान २ वर)

## हल्दानी येथील कथित शुद्धीकरणाच्या निषेधार्थ भीमशक्तीचे जालन्यात मुंडन व पिंडदान आंदोलन

**जालना - प्रतिनिधी**

उत्तराखंड राज्यातील हल्दानी येथील रामलीला मैदानावरील कथित शुद्धीकरणाच्या निषेधार्थ भीमशक्ती या सामाजिक संघटनेच्या वतीने आज ( दि. १८) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामुहिक मुंडन व पिंडदान आंदोलन करण्यात आले.

भीमशक्तीचे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश अण्णा घुले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.यावेळी बोलतांना घुले म्हणाले की, उत्तराखंड राज्यातील हल्दानी




येथील रामलीला मैदानावरील राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी भाषण केल्यानंतर त्या ठिकाणी गोमूत्र शिंपडून मंत्रोच्चाराद्वारे शुद्धीकरण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे, सदर प्रकाराचा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.सामाजिक समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांच्या विरोधात जाणाऱ्या अशा प्रतिगामी प्रवृत्तींच्या निषेधार्थ राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या मार्गदर्शनानुसार भीमशक्तीच्या वतीने राज्यव्यापी प्रतिकात्मक आंदोलन करण्यात येत आहे.शुद्धीकरणाचा प्रकार हा प्रतिगामी प्रवृत्तींची मानसिकता दर्शविणारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भीमशक्तीचे मराठवाडा सरचिटणीस भास्कर साळवे, डॉ.शिवाजी लहाने आदींनी मनोगत व्यक्त करतांना प्रतिगामी प्रवृत्तींच्या शुध्दीकरणावर कडाडून टीका केली. यावेळी भीमशक्तीच्या कार्यकर्त्यांनी (पान २ वर)

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून, अवयव प्रत्यारोपणासाठी ७९८ रुग्णांना १५.७३ कोटींची मदत

**मुंबई –प्रतिनिधी**

यकृत, मूत्रपिंड, फुप्फुस, हृदय आदी अवयव निकामी झाल्यानंतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हाच रुग्णांसाठी शेवटचा पर्याय ठरतो. मात्र या उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे करतो. या अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी राज्यातील गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरत असून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ७९८ रुग्णांना १५ कोटी ७९ लाख ६६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.




वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होत आहेत. त्यामुळे किडनी, यकृत, हृदय आणि फुप्फुस निकामी झालेल्या अनेक रुग्णांसाठी उपचाराची नवी आशा निर्माण झाली आहे. मात्र, अशा शस्त्रक्रियांसाठी खाजगी रूग्णालयात लाखो रुपयांचा खर्च येत असल्याने अनेक गरजू रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कठीण परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून, त्यांच्या कुटुंबांनाही (पान २ वर)

**१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत : १५.७९ कोटींची मदत**

मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रुग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रुपयांची मदत देण्यात आली. यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना ३ कोटी २१ लाख ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. फुप्फुस प्रत्यारोपणासाठी ०३ रूग्णांना ६ लाख रूपयांची मदत देण्यात आली. तर, हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रुग्णांना २८ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर उपचारांसाठी लागणारा वेळ कमी करणे, अर्ज प्रक्रियेतील अडथळे दूर करून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळणे सोयीचे झाले आहे. अवयव प्रत्यारोपणासारख्या खर्चिक उपचारांसाठी आर्थिक मदत वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान, अद्ययावत करण्यात आली आहे. गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**- रामेश्वर नाईक,**
**कक्ष प्रमुख,**
**मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष**

## महा वॉकेथॉन २०२६' मध्ये अभिनेते संजय दत्त यांचा सहभाग

**मुंबई - प्रतिनिधी**

माती आणि जलसंधारणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन २०२६ - वॉक फॉर वॉटर' हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या राज्यव्यापी उपक्रमात सहभागी होण्यासाठी अभिनेते संजय दत्त यांना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी निमंत्रित केले असून, त्यांनी हे निमंत्रण स्वीकारले आहे. जलसंधारणाचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचावा आणि हा उपक्रम लोकचळवळीचे स्वरूप धारण करावा, या उद्देशाने लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, कलाकार, खेळाडू, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्य नागरिकांना 'महा वॉकेथॉन'मध्ये सहभागी करून घेण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कमाल ३ किलोमीटर अंतराची महा वॉकेथॉन आयोजित केली आहे. या वॉकेथॉननंतर सहभागींकडून मृद व जलसंधारणाची शपथ घेतली जाणार आहे. सहभागी नागरिकांना ई-प्रमाणपत्र देण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात येणार आहे. या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरावर प्रथम १० विजेत्यांचा गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे. याशिवाय प्रायोजकांच्या माध्यमातून एकूण ₹७१,००० रुपयांची रोख पारितोषिके देण्याचे प्रस्तावित आहे. त्यामध्ये प्रथम क्रमांकासाठी (पान २ वर)



# संपादकीय...

## राष्ट्रवादीसमोर जालन्यात अस्तित्वाची लढाई; पराभवाचे खापर मित्रपक्षावर फोडून संघटना उभी राहणार का?

जालना जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणाला सध्या एका निर्णायक वळणावर आणून ठेवणारी परिस्थिती आहे. मुंबईतील राष्ट्रवादी भवनात शरद पवार, शशिकांत शिंदे, सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांच्या उपस्थितीत झालेली जालना जिल्ह्याची आढावा बैठक ही केवळ संघटनात्मक बैठक म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. महानगरपालिका निवडणुकीतील पराभव, कमकुवत झालेली संघटनात्मक पकड, युवा वर्गापासून वाढलेले अंतर आणि बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला जालन्यात नव्याने उभे करण्याचा हा प्रयत्न आहे. मात्र प्रश्न असा आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसला खरोखरच नव्याने उभे राहायचे असेल तर सुरुवात नेमकी कुठून होणार? महानगरपालिका निवडणुकीत पक्षाच्या एकाही उमेदवाराला विजय मिळविता आला नाही, ही बाब निश्चितच गंभीर आत्मपरीक्षणाची मागणी करते. या पराभवामागे मित्रपक्षाची कथित दगाबाजी कारणीभूत ठरल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. राजकीय समीकरणांमध्ये अशा तक्रारी असू शकतात; परंतु एखाद्या पक्षाचा पूर्णपणे झालेला पराभव केवळ मित्रपक्षाच्या दगाबाजीने स्पष्ट होतो का, हा मूलभूत प्रश्न आहे. मित्रपक्षाने साथ दिली नाही, हा पराभवाचा एक घटक असू शकतो; पण संघटना स्वतः किती सक्षम होती, हा त्याहून मोठा प्रश्न आहे. निवडणुकीत उमेदवार उभे करण्यापासून ते बूथ पातळीवरील यंत्रणा, मतदारांशी सातत्यपूर्ण संपर्क, स्थानिक नेतृत्वाची स्वीकारार्हता, कार्यकर्त्यांची सक्रियता आणि तरुणांचा सहभागया प्रत्येक बाबीचे कठोर आत्मपरीक्षण झाले पाहिजे. अन्यथा प्रत्येक पराभवानंतर दोष दुसऱ्याच्या माथी मारण्याची राजकीय संस्कृती पक्षाला पुढे नेणार नाही. पवारांच्या पक्षासमोर जालन्यातील सर्वात मोठे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसची जालना जिल्ह्यात एकेकाळी असलेली राजकीय ताकद आणि आजची परिस्थिती यामध्ये मोठी दरी निर्माण झालेली दिसते. जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा आढावा घेण्याची गरज निर्माण होणे हेच संघटनेसमोरील आव्हानाची तीव्रता दाखवते. जिल्हाध्यक्षपदी ॲड. संजय काळबांडे यांची नियुक्ती करून पक्षाने नव्या संघटनात्मक नेतृत्वाला संधी दिली आहे. मात्र जिल्हाध्यक्ष बदलणे किंवा नवीन पदाधिकारी नियुक्त करणे हा संघटनबांधणीचा केवळ पहिला टप्पा आहे. खरी परीक्षा गाव, वॉर्ड आणि बूथपर्यंत संघटना पोहोचविण्याची आहे.

कार्यालयात बैठक घेऊन संघटना मजबूत होत नाही. ती मजबूत होते ती कार्यकर्त्यांच्या सततच्या जनसंपर्कातून.

तरुणांना जोडण्याचा निर्णय स्वागतार्ह; पण त्याला दिशा हवी रोहित पवारांनी जालन्यातील तरुणांना मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडण्यावर भर दिला आहे. हा निर्णय राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण आजचा तरुण केवळ पक्षाच्या पारंपरिक विचारधारेवर मतदान करत नाही. त्याला रोजगार, शिक्षण, उद्योग, डिजिटल संधी, स्पर्धा परीक्षा, स्थानिक सुविधा आणि भविष्यातील नेतृत्व याबाबत ठोस भूमिका हवी आहे.

त्यामुळे तरुणांना पक्षात आणण्यासाठी केवळ पदे वाटणे किंवा सोशल मीडिया टीम तयार करणे पुरेसे ठरणार नाही.

तरुणांना निर्णयप्रक्रियेत स्थान द्यावे लागेल. नेतृत्वाची संधी द्यावी लागेल. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना केवळ गर्दी म्हणून नव्हे, तर राजकीय शक्ती म्हणून स्वीकारावे लागेल.

जालना शहरापासून ग्रामीण भागापर्यंत युवकांच्या स्थानिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणारे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस तयार करू शकली, तर पक्षाच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सुरू होऊ शकते. जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेण्याचे आवाहनआता कृतीची वेळ शेतकरी, पाणी, बेरोजगारी, उद्योग, रस्ते, शिक्षण आणि नागरी सुविधांचे प्रश्न घेऊन पक्षाने आक्रमक भूमिका घ्यावी, अशी दिशा बैठकीत देण्यात आली आहे. ही दिशा योग्य आहे. परंतु जालनेकरांना आता घोषणा नकोत; सातत्यपूर्ण संघर्ष आणि त्याचा परिणाम हवा आहे. जालना शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक, अतिक्रमण, स्वच्छता, उद्योग, रोजगार यांसारखे असंख्य प्रश्न नागरिकांसमोर आहेत. ग्रामीण भागात शेतकरी, सिंचन, बाजारपेठ, वीज आणि रोजगाराचे प्रश्न आहेत. या प्रश्नांवर राष्ट्रवादी काँग्रेसने सातत्याने भूमिका घेतली आणि त्यासाठी रस्त्यावर उतरले, तरच पक्षाचा जनतेशी पुन्हा संबंध प्रस्थापित होऊ शकतो. फक्त पवारांच्या नावावर पक्ष उभा राहणार नाही जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेससमोर आणखी एक कठीण वास्तव आहे. शरद पवारांचे नेतृत्व पक्षाची मोठी राजकीय ताकद असले तरी केवळ पवारांच्या नावावर स्थानिक संघटना कायमस्वरूपी उभी राहू शकत नाही.

स्थानिक पातळीवर स्वीकारार्ह चेहरे, सक्रिय कार्यकर्ते आणि मतदारांशी भावनिक व राजकीय संबंध निर्माण करणारे नेतृत्व तयार करणे आवश्यक आहे. पक्षाच्या जुन्या कार्यकर्त्यांचा अनुभव आणि नव्या पिढीची ऊर्जा यांची सांगड घालणे ही काळाची गरज आहे. आता 'आढावा बैठक' नव्हे, तर 'परिणामांची बैठक' हवी मुंबईतील बैठकीत दिशा मिळाली आहे. आता जालना जिल्ह्यात त्याची अंमलबजावणी होते का, हा खरा प्रश्न आहे. आठही तालुक्यांत संघटनात्मक फेरबांधणी, बूथनिहाय कार्यकर्त्यांचे जाळे, युवकांचे संघटन, महिला सहभाग, सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष जनसंपर्क, स्थानिक प्रश्नांवरील आंदोलने आणि प्रत्येक निवडणुकीसाठी स्वतंत्र रणनीतीया सर्व गोष्टी वेळबद्ध पद्धतीने झाल्या पाहिजेत. राष्ट्रवादीसमोर आता दोन पर्याय आहेतपराभवाचे कारण शोधत बसायचे किंवा पराभवातून नवी राजकीय ताकद उभी करायची. मित्रपक्षाने दगाबाजी केली असेल तर त्याचा धडा घ्यावा; परंतु स्वतःची संघटना इतकी सक्षम करावी की पुढील वेळी कोणत्याही पक्षाच्या कृपेची गरज भासू नये. जालन्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे पुनरुज्जीवन हे केवळ एका पक्षाचे राजकीय लक्ष्य नाही; ते स्थानिक राजकारणातील सत्तासमतोलही बदलू शकते. त्यामुळे मुंबईतील वरिष्ठ नेत्यांनी दिलेल्या आदेशांपेक्षा जालना जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्या आदेशांना किती प्रामाणिकपणे जमिनीवर उतरवतात, यावरच राष्ट्रवादीच्या पुढील राजकीय प्रवासाचे भवितव्य ठरणार आहे. कारण निवडणूक हरल्यावर कारणे सांगणारा पक्ष अनेक असतात;

पण पराभवातून संघटना उभी करून पुन्हा जनतेचा विश्वास मिळवणारा पक्षच खरा राजकीय पक्ष ठरतो.

# पान १ व ४ वरुन...

### युवक, विद्यार्थी व...

आर्थिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम होतात. त्यामुळे व्यसनमुक्ती ही केवळ एका व्यक्तीची जबाबदारी न राहता संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. सहाय्यक आयुक्त अनिता राठोड यांनी व्यसन ही केवळ संबंधित व्यक्तीची समस्या नसून त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावर होत असल्याचे सांगितले. व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींना योग्य वेळी मार्गदर्शन, समुपदेशन आणि आवश्यक उपचार मिळणे गरजेचे आहे. व्यसनमुक्तीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

युवकांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन

जिल्हा परिषदेचे जनसंपर्क अधिकारी भगवान तायड यांनी प्रास्ताविकातून नशामुक्त भारत अभियानाची उद्दिष्टे स्पष्ट केली. व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी नागरिकांची भूमिका महत्त्वाची असून, विशेषतः युवक आणि विद्यार्थ्यांनी अमली पदार्थ, तंबाखू, गुटखा व दारू यांसारख्या व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

आजच्या काळात युवकांमध्ये व्यसनांचे वाढते आकर्षण ही चिंतेची बाब असून, त्याला आळा घालण्यासाठी केवळ शासकीय पातळीवरील उपाययोजना पुरेशा नाहीत. कुटुंब, शाळा-महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिकांनी एकत्रितपणे जनजागृती करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कालापथक व पथनाट्यातून व्यसनमुक्तीचा संदेश

कार्यक्रमात केवळ मार्गदर्शन न करता कलाविष्काराच्या माध्यमातूनही व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला. चांदई टेपली येथील शाहीर उषाताई कावके व त्यांच्या सहकाऱ्यांनी कालापथकाच्या माध्यमातून व्यसनांचे दुष्परिणाम आणि त्यापासून दूर राहण्याचा संदेश दिला.

तसेच बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील पल्लवी व सहकाऱ्यांनी पथनाट्य सादर करून व्यसनाधीनतेमुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाजासमोर निर्माण होणाऱ्या समस्यांचे प्रभावी चित्रण केले. या सादरीकरणाला उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'नशामुक्त भारत'चा सामूहिक निर्धार

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'नशामुक्त भारत' निर्माण करण्याची शपथ घेतली. व्यसनमुक्तीचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

विशेषतः युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी शासकीय यंत्रणेबरोबरच सामाजिक संस्था आणि नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेतील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहारा सामाजिक विकास संस्थेचे एम. बी. सय्यद यांनी केले, तर तेजस जनविकास संस्थेचे शिवाजी तायडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### वाळू-गुटख्यासोबत...

तपासाबाबतीत पोलिस विभाग गांभिर्याने काम करत आहे.

अवैध वाळू वाहतूक व तस्करीविरोधातही मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. वाळू चोरीचे १८७ गुन्हे दाखल झाले असून सर्व १८७ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. या कारवाईत ३३१ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच प्रतिबंधित गुटख्याशी संबंधित ७८ गुन्हे दाखल असून सर्व ७८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत आणि ६९ आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती दिली आहे.

या आकडेवारीवरून स्थानिक गुन्हे शाखेकडून विविध प्रकारच्या गुन्ह्यांवर समांतरपणे तपास व कारवाई सुरू असल्याचे दिसून येते. विशेषतः वाळू चोरी व गुटखा प्रकरणांमध्ये दाखल झालेल्या सर्व गुन्ह्यांची उकल झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. गंभीर गुन्ह्यांमध्येही दरोडा व खुनाच्या गुन्ह्यांची मोठ्या प्रमाणावर उकल करण्यात आली असून चोरी, जबरी चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांतही आरोपींचा शोध घेऊन अटक करण्यात आली आहे. तसेच दाखल गुन्ह्यांचा तपास, आरोपींचा शोध, अटक आणि गुन्हे उघडकीस आणण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव स्पष्ट केले आहे.

### जालना येथे सप्टेंबरमध्ये...

श्रीकृष्णांचे वाङ्मयी स्वरूप आहे. ज्याप्रमाणे राजा परीक्षिताने या कथेचे श्रवण करून मोक्षाची प्राप्ती केली, त्याचप्रमाणे या पवित्र प्रौष्ठपदी पर्वामध्ये जालनेकरांना गोविंददेव गिरीजी महाराजांच्या ओजस्वी व अमृततुल्य वाणीतून ही कथा ऐकण्याचे परम भाग्य लाभत आहे. ही केवळ कथा नसून मानवी जीवनाला संस्कारित व उन्नत करणारा वैदिक ज्ञानयज्ञ आहे. भक्ती ज्ञानगंगा समितीचे हे दिव्य कार्य जालना नगरीला अध्यात्म आणि संतांच्या कृपेने समृद्ध करेल, असे ते म्हणाले.

याप्रसंगी श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, माहेश्वरी समाजाचे प्रदेश कोषाध्यक्ष संजय दाड, दैनिक यजमान विजय राठी, सीए डॉ. नितीन तोतला, रामजी उपाध्याय, अनिल पंच, नितीन बागडी, माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष दामोधर बजाज, सचिव दिलीप चेचानी, शहराध्यक्ष विजय राठी, सचिव उमेश बजाज, सत्यनारायण सारडा, लक्ष्मीनारायण मानधना, राजेंद्र मंत्री, दिनेश भक्कड, निलेश चेचानी, विजय चेचानी, निखिल चेचानी, माधव चेचानी, सुनिल बियाणी, धनंजय झंवर, दीपक सोमानी यांच्यासह जालना शहरातील विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जालना शहरात परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या मुखारविंदातून प्रथमच भव्य श्रीमद्□ भागवत कथेचे आयोजन होणे, हे आपल्या संपूर्ण शहरासाठी अत्यंत अभिमानाची व सौभाग्याची बाब आहे. भाविकांना या दिव्य ज्ञानगंगेचा सहज लाभ घेता यावा हाच आमचा मुख्य उद्देश असून, कथेची वेळ दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ अशी आहे. मराठवाड्यात असलेल्या स्वामींच्या शिष्य परिवारांसह जालना शहरातील भाविकांनी या ऐतिहासिक व पवित्र कथेचे श्रवण करून आपले जीवन धन्य करावे, असे आवाहन श्री चेचानी यांच्यासह भक्ती ज्ञानगंगा श्रीमद्□ भागवत कथा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

### हल्दानी येथील...

जोरदार नारेबाजीही केली. प्रकाश घुले यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. तत्पूर्वी प्रकाश घुले यांच्यास भीमशक्तीच्या कार्यकर्त्यांनी मुंडन करून शुद्धिकरणाचा निषेध नोंदविला.

या मुंडन आंदोलनात सुरेश कोळे, दादाराव हिवाळे, आसाराम चोरमारे,सुनील तुरेराव,गौतम सदावर्ते, सुनील नावकर,समाधान शिंदे, अशोक साळवे, कैलास सुरडकर,महेंद्र मोरे, रमेश साळवे, अरूण सोनावणे, भीमराव साळवे, अशोक साळवे,अर्जुन कांबळे, रविंद्र साळवे, प्रकाश साळवे, सुरेश साळवे, केरुबा साळवे, सुशील जाधव आदींचा समावेश होता.

### जालन्यात दोन...

**संभाजीनगर भागातून पहिली तलवार जप्त**

दरम्यान, पोलिसांना रोहित दिनेश राजपुत (वय १९, रा. ओम शांती गल्ली, संभाजीनगर, जालना) याच्याकडे अवैध तलवार असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने त्याचा शोध घेतला असता तो संभाजीनगर परिसरातील त्याच्या राहत्या घरी आढळून आला.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडून सुमारे १ हजार ५०० रुपये किमतीची एक अवैध तलवार जप्त करण्यात आली.

**चौकशीत मित्राचेही नाव समोर**

रोहित राजपुत याच्याकडे चौकशी केली असता त्याचा मित्र आदित्य सुरेश सोळंके (वय २०, रा. तीन मंदिर गल्ली, संभाजीनगर, जालना) याच्याकडेही तलवार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानंतर पोलिसांनी आदित्य सोळंके याचा शोध सुरू केला. तो स्वामी समर्थ वेल्डिंग दुकान, सागर गल्ली, भोकरदन नाका परिसरात आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन तलवारीबाबत विचारणा केली असता त्याने दुकानातून तलवार काढून दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही तलवारही पोलिसांनी जप्त केली असून तिची किंमत सुमारे १ हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**एकूण २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून एकूण दोन अवैध तलवारी जप्त केल्या. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २ हजार ५०० रुपये आहे.

| आरोपी | वय | परिसर | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| रोहित दिनेश राजपुत | १९ | ओम शांती गल्ली, संभाजीनगर, जालना | १ तलवार ₹१,५०० |
| आदित्य सुरेश सोळंके | २० | तीन मंदिर गल्ली, संभाजीनगर, जालना | १ तलवार ₹१,००० |
| एकूण | | | २ तलवारी ₹२,५०० |

दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी सदर बाजार पोलीस ठाणे, जालना येथे हजर करण्यात आले आहे.

**अवैध शस्त्रांवर पोलिसांची नजर**

जालना शहरात मागील काही दिवसांत अवैध शस्त्रांबाबत पोलिसांकडून सातत्याने कारवाया करण्यात येत आहेत. त्यामुळे तरुणांकडून विनापरवाना शस्त्रे बाळगण्याच्या प्रकारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी माहिती संकलन आणि तपासणी वाढविल्याचे दिसून येत आहे.

विशेषतः सार्वजनिक ठिकाणी तलवार, चाकू अथवा इतर घातक शस्त्रे बाळगण्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी अवैध शस्त्रांची माहिती मिळताच तातडीने कारवाई करण्याच्या सूचना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या आहेत.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जालना अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, शिवप्रसाद एंखडे, बाबासाहेब गायकवाड, कैलास चेके, योगेश सहाने, सागर बाविस्कर आणि दत्ता वाघुंडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

अवैध शस्त्रे कोठून आणण्यात आली, त्यांचा वापर कशासाठी करण्यात येणार होता आणि या प्रकरणामागे आणखी कोणी व्यक्ती आहे का, याबाबत पुढील तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

### मुख्यमंत्री वैद्यकीय...

मोठा दिलासा मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रुग्णकेंद्रित करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू करण्यात आली आहे. या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय मदत अधिक वेगाने उपलब्ध होत आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठीचा अर्ज आता रुग्णाऐवजी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयामार्फत थेट सादर केला जात आहे. त्यामुळे रुग्णांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता राहिली नाही. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अर्ज मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण होत असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांना गती मिळणार आहे.

### महा वॉकेथॉन...

₹२५,०००, द्वितीय क्रमांकासाठी ₹१५,००० आणि तृतीय क्रमांकासाठी ₹१०,००० रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच सोडतीद्वारे सात सहभागींची निवड करून प्रत्येकी ₹३,००० विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे.

'Save Soil, Save Water, Secure Tomorrow' तसेच 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेश घेऊन होणाऱ्या या उपक्रमातून जलसंधारणाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह, तसेच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून २१ ऑगस्ट रोजी होणारा 'महा वॉकेथॉन' जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### विकासकाच्या नफेखोरीला...

आहे. अनेकदा विकासक प्रकल्प ताब्यात घेतात, परंतु वेळेवर काम पूर्ण करत नाहीत, ज्यामुळे सामान्य नागरिकांना वर्षानुवर्षे हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. हा निकाल अशा सर्व सोसायट्यांना बळ देणारा आहे, ज्यांना विकासकांच्या दिरंगाईचा सामना करावा लागत आहे. यातून महाराष्ट्र आणि जालना येथील प्रशासनाने हे शिकले पाहिजे की, पुनर्विकास प्रकल्पांमध्ये रहिवाशांचे हित सर्वोच्च असले पाहिजे. विकासकाच्या नफेखोरीसाठी नागरिकांच्या जीविताशी खेळ होऊ नये. हा निकाल म्हणजे कायद्याचे राज्य असल्याचे सिद्ध करणारा असून, तो प्रत्येक नागरिकाचा आत्मविश्वास वाढवणारा आहे.''न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले की, विकासकाला अंतरिम दिलासा दिल्यास पुनर्विकास प्रकल्प अनिश्चित काळासाठी लांबेल आणि रहिवाशांचे जीवन धोक्यात येईल. याउलट, दिलासा नाकारल्यास विकासकाचे केवळ नफा कमावण्याचे नुकसान होईल, ज्याची भरपाई, जर तो खटला जिंकला तर, लवादाच्या निर्णयानुसार केली जाऊ शकते. मात्र, रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या हक्काची कोणत्याही आर्थिक मोबदल्यात भरपाई होऊ शकत नाही.अखेरीस, न्यायालयाने विकासकाची याचिका फेटाळून लावली आणि सोसायटीला नवीन विकासकासोबत पुढे जाण्याचा मार्ग मोकळा करून दिला. तसेच, दोन्ही पक्षांमधील विवादांवर निर्णय घेण्यासाठी न्यायालयाने ॲडव्होकेट अमृत जोशी यांची एकमेव लवाद म्हणून नियुक्ती केली आहे. या निकालामुळे रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती मिळण्याची आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होण्याची आशा निर्माण झाली आहे.

### सौ. संध्या संजय...

व कार्यकर्त्यांनी सौ. देठे यांचे अभिनंदन केले आहे.

सौ. देठे यांनी ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा विश्वास व्यक्त केला.

### १२ व १३ डिसेंबर...

मुला-मुलींनी काढलेली नव्या पिढीची चित्रेही मांडली जाणार आहेत. जुन्या पिढीची थेट चित्रे न मिळाल्यास त्याची प्रत मांदण्यात येईल. बालकाना चित्राच्या विषयांचे कोणतेही बंधन नाही. आंबाजोगाईचा भोवताल व्यक्त करणाऱ्या फोटोचा (छायाचित्रांचा) यां प्रदर्शनात एक वेगळा भाग केला जकणार आहे.

**गावाबद्दल स्मरणिका**

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित केली जाणार आहे. स्मरणिकेत आंबाजोगाईच्या आठवणी असतील. मान्यवर लेखक तर लिहितीलच पण सामान्यपणे न लिहिणाऱ्या लोकांच्या आठवणीना प्राधान्य दिले जाणार आहे. कोठेही असलेल्या आंबाजोगाईकरांनी त्यासाठी आठवणी लिहून पाठवाव्या असे आवाहन करण्यात आले आहे.

**दोन दिवंगतांची नावे**

संभाजीनगर येथे येऊन मोठे नाव कमवलेल्या आंबाजोगाईच्या दोन दिवंगत सुपुत्रांची नावे साहित्य नगरी व सभामंचाला देण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध चित्रकार दिलीप बडे व जेष्ठ नाट्यकर्मी डॉ. चंदू सोमण या दोन सुपुत्रांची आठवण ह संमेलन ज्वलंत ठेवणार आहे.

**उत्स्फूर्त प्रतिसाद-**

गाव केवळ भूगोलात नसते तर ते त्यागावात राहून गेलेल्यांच्या मनात वसते, ही संकल्पना अमर हबीब यांनी मांडली. संभाजीनगर येथे राहणाऱ्या आंबाजोगाईकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन त्याची प्रचिती दिली. शकुंतला लोमटे यांनी ह संमेलन बियाणे ठरेल असा विश्वास व्यक्त केला. स्वागत समितीचे सचिव गोरख शेंद्रे, डॉ. राहुल धाकडे (अध्यक्ष, मसाप), डॉ शैलजा बरुरे (उपाध्यक्ष, मसाप), डॉ रत्नाकर देशपांडे, दासू वैद्य, प्रभाकर आगळे, डॉ. दिलीप घारे, सुनील काळदाते, सुलभा खंदारे, डॉ शिरीष खेडगीकर, सुरेंद्र पाटील, गोविंद हुंबे, पिंपळकर, विलास इंगळे, बलराज संघई, अश्विनी चौधरी, वरदाताई सोमण, डॉ अल्का खेडगीकर, ज्योती संभूस, मनीषा फडके, अरुण थोरात, आदी अनेक मान्यवर बैठकीला उपस्थित होते.

### उर्दू माध्यमातील...

पत्ता,''वीनस फूट वेअर, शहीद भगतसिंग चौक, मेन रोड, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर ४३१११२'' निबंध व पुरस्कारासाठीचे प्रस्ताव पाठवण्याची अंतिम मुदत १२ सप्टेंबर २०२६ (शनिवार) आहे. अधिक माहितीसाठी शेख अब्दुल रहीम (९६५७५२४५४५) यांच्याशी संपर्क साधावा....

### विक्रमी व साहसी...

न्योमा, होले व चमूमले अशा विविध टप्प्यातून उमलिंगला पास पर्यंत पोहोचला. त्यांच्या या अतिशय खडतर सहसपूर्ण विक्रमी सायकलिंग बद्दल माजी नगरातील भास्करराव अंबेकर यांनी कौतुक केले. यावेळी माजी शहर प्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, संजय अग्रवाल, दिनेश अग्रवाल, भरत गादीया, विजय शेंदरकर, बबनराव काजळे, जीवन खंडागळे यांच्यासह आदींची उपस्थिती

होती.

### डाक जीवन...

खालीलप्रमाणे इन्सेंटिव्ह देण्यात येईल.

व्यवसाय प्राप्ती इन्सेंटिव्हः विमा पॉलिसीचा प्रकार व प्रीमियम भरण्याच्या कालावधीनुसार प्रथम वर्षाच्या प्रीमियमच्या ४% से २०% पर्यंत. व्यवसाय प्राप्ती इन्सेंटिव्हः सर्व प्रकारच्या पॉलिसींवर प्रथम वर्षाच्या व्यवसाय प्राप्ती प्रीमियमच्या १०%.नूतनीकरण (म्हणजे दुसऱ्या वर्षापासून) इन्सेंटिव्हः पॉलिसींवर १% आणि पॉलिसींवर २.५%.

सेवानिवृत्तीनंतरचे लाभः म्हणून कार्यरत असताना प्राप्त केलेल्या व्यवसायावर सेवानिवृत्तीनंतरही नूतनीकरण इन्सेंटिव्ह मिळवत राहता येईल. यासाठी संबंधित यांनी सेवानिवृत्तीच्या तीन महिन्यांच्या आत फील्ड ऑफिसर () म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. अर्ज कसा करावाःपात्र शासकीय कर्मचारी विहित नमुन्यातील अर्जासोबत कार्यालयीन ओळखपत्राची साक्षांकित प्रत, , पत्त्याचा पुरावा तसेच आपल्या मूळ विभागाकडून प्राप्त आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र () जोडून प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर डाक विभाग ४३१ ००१ यांच्या कार्यालयात अर्ज सादर करू शकतात.

### जिल्हा परिषद...

७/१२, ८ अ उतारा,आधार कार्ड, बँक पासबुक तसेच ट्रॅक्टरचलीत औजारांसाठी अर्जदाराचे स्वतःच्या नावे असलेले ट्रॅक्टर आवश्यक आहे. तरी जिल्ह्यातील शेतक-यांनी योजनेचा लाभ घेणे करीता संबंधीत पंचायत समिती स्तरावर दि. १९ ऑगस्ट २०२६ ते दि. ११ नोव्हेंबर २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत ऑफलाईन पध्दतीने अर्ज करावेत. या योजनेसाठी जास्तीत जास्त शेतक-यांनी अर्ज करून सहभाग नोंदवावा असे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, आणि कृषी विकास अधिकारी पी. बी. बनसावडे यांनी आवाहन प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# जलसंधारणातून घडवूया बारमाही हिरवा महाराष्ट्र

पाऊस पडतो तेव्हा आपण आनंदतो; पण तोच पाऊस वाहून जातो तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब जमिनीवर थांबविणे, तो जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हीच आजच्या महाराष्ट्राची सर्वात मोठी गरज आहे. म्हणूनच यंदा २१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा जलसंधारण दिन हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता लोकसहभागाची नवी सुरुवात ठरली पाहिजे.

शासनाने माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २१ ऑगस्टला दरवर्षी 'जलसंधारण दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे जलसंधारण क्षेत्रातील सुधाकरराव नाईक यांच्या योगदानाचे स्मरण आणि जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. या दिवशी जलपूजन, विविध जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, श्रमदान, जनजागृती, उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव आदी उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याच पार्श्वभूमीवर राज्यात जलसंधारण दिनाच्या निमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात शासकीय कार्यालयांमध्ये मृद व जलसंधारणाची शपथ घेऊन या लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉनवॉक फॉर वॉटर', रील्स स्पर्धा, जलपूजन, श्रमदान आणि जनजागृतीचे उपक्रम नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आयोजित केले जात आहेत.

**जलसंधारण म्हणजे काय**

पावसाचे पाणी शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात जमिनीवर अडविणे, त्याचा वेग कमी करणे, जमिनीत मुरविणे, भूजलाचे पुनर्भरण करणे, जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, याला व्यापक अर्थाने जलसंधारण म्हणता येईल. जलसंधारण म्हणजे केवळ बंधारा बांधणे नव्हे. पाण्याचा प्रत्येक थेंब जिथे पडतो, तिथेच त्याचा अधिकाधिक उपयोग करणे, ही त्यामागची मूलभूत संकल्पना आहे.

महाराष्ट्रासाठी ही बाब अधिक महत्त्वाची आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५२ टक्के क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. पावसाचे भौगोलिक आणि कालिक वितरण असमान आहे. काही भागात अतिवृष्टी होते, तर काही भागात पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे 'पाणी आहे, पण योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी नाही' हीच मोठी समस्या आहे. जलसंधारणातून या विसंगतीवर मात करता येते.

**महाराष्ट्राच्या जलसंधारणाची मुळे**

महाराष्ट्रात जलसंधारणाची परंपरा नवी नाही. गावागावातील तलाव, बंधारे, पाझर तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलव्यवस्थापन ही ग्रामीण जीवनाची पूर्वापार साधने आहेत. ही परंपरा थेट छत्रपती शिवरायांचा काळापर्यंत जाते. गड किल्ल्यावर पावसाचे पाणी साठवण्याची मोठी परंपरा आहे. यावर महाराष्ट्राने शिवकालीन पाणी साठवण योजनाही सुरु केली आहे. आधुनिक शासकीय पातळीवर मात्र जलसंधारणाला स्वतंत्र संस्थात्मक दिशा मिळाली ती स्वतंत्र जलसंधारण विभागाच्या स्थापनेमुळे.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही १९७२ च्या दुष्काळानंतर जलसंधारण माध्यमातून 'जलक्रांन्ती' घडवून आणली होती. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणलोट क्षेत्र वाढवले मोठ्या धरणांपेक्षा बॅरेजेसला महत्व दिले

**जलयुक्त शिवारातून नव्या पर्वाला सुरुवात**

जलसंधारणाला मोठ्या प्रमाणावर लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने २०१४ नंतरचा काळ महत्त्वाचा ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. या योजनेतून पुढे हजारो हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. लक्षावधी टीएमसी पाणी साठा निर्माण झाला. हजारो गावे पाणीदार झाली. त्यांचा शाश्वत विकास झाला.

आज जलयुक्त शिवार २.०च्या माध्यमातूनही जलसंधारण, जलसाक्षरता, लोकसहभाग आणि उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनीही स्पष्टपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणातून परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

**योजनांची ताकद, लोकसहभागाची साथ**

महाराष्ट्राने जलसंधारणासाठी अनेक मार्ग स्वीकारले आहेत. 'मागेल त्याला शेततळे' योजनेला २०१६ मध्ये सुरुवात करून शेतकऱ्यांना स्वतःची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची संधी देण्यात आली.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही संकल्पना तर जलसंधारण आणि शेती यांची सांगड घालणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता वाढते आणि तोच गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २०२४ मध्ये ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे, गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, सलग समतल चर, शेततळी, जलस्रोतांमधील गाळ काढणे, बांधावर वृक्ष व बांबू लागवड अशा असंख्य उपाययोजना राज्यात राबविल्या जात आहेत.

**देशातील प्रेरणादायी उपक्रम**

राजस्थानच्या अलवरमध्ये पारंपरिक 'जोहड' या पावसाच्या पाण्याच्या साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन करून गावकऱ्यांनी जलव्यवस्थापनाचे प्रभावी मॉडेल उभे केले.

जलतज्ज्ञ आणि 'वॉटर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील लोकसहभागातून कोरड्या प्रदेशात जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आणि अरवरीसारख्या नद्यांना पुन्हा प्रवाह मिळाला.

महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार ही दोन उदाहरणे तितकीच प्रेरणादायी आहेत. राळेगणसिद्धीत नाला बांध, गली प्लगिंग, समतल चर, पाझर तलाव आणि लोकसहभागातून दुष्काळी गावाचा कायापालट झाला. हिवरे बाजारने पाण्याचे बजेट, पिकांचे नियोजन, ठिबक सिंचन, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण यांची सांगड घालत जलसुरक्षेचे आदर्श मॉडेल निर्माण केले.

**नागरिकांनी काय करायचे**

शासन आपले काम करीत आहे; परंतु जलसंधारणाची खरी यशोगाथा नागरिकांच्या सहभागाशिवाय पूर्ण होणार नाही. या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने आपल्या घराच्या छतावरील पाणी साठविण्याची किंवा जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी. गावांनी पाण्याचा ताळेबंद तयार करावा. शेतकऱ्यांनी शेततळी, बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, ठिबक-सिंचन आणि पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार नियोजन करावे. गावातील नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांची स्वच्छता व देखभाल करावी. शक्य तेथे श्रमदान करावे. पाणी वाया जाणार नाही, याची प्रत्येक कुटुंबाने काळजी घ्यावी.आणि पावसाळा सुरु आहे. वृक्ष लागवडीत कुटूंबाने दरवर्षी एक या प्रमाणे वृक्ष लागवड करावी.

जलसंधारण हा केवळ मृद व जलसंधारण विभागाचा विषय नाही; तो कृषीचा, ग्रामविकासाचा, पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि भविष्यातील पिढ्यांचा विषय आहे. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर गावाची अर्थव्यवस्था वाचेल आणि गाव समृद्ध झाले तर महाराष्ट्र समृद्ध होईल. म्हणून २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस न राहता प्रत्येकाच्या मनात एक संकल्प निर्माण करणारा दिवस ठरू दे. चला !जलसंधारणातून 'बारमाही हिरवा महाराष्ट्र!' घडवूया!

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.क्र.९७०२८५८७७७**

# लिव्ह-इन रिलेशनशिप विवाहसंस्थेला पर्याय ठरु शकत नाही

बदलत्या जीवनशैलीबरोबर नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत आहे. शहरांमध्ये काही तरुण-तरुणी विवाह न करता एकत्र राहण्याचा अर्थात 'लिव्ह-इन रिलेशनशिप'चा पर्याय स्वीकारताना दिसतात. परस्परांची समज, स्वभाव आणि सुसंवाद तपासण्यासाठी हा पर्याय निवडला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र लिव्ह-इन रिलेशनशिपला विवाहसंस्थेचा पर्याय मानणे योग्य ठरेल का, हा सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर विचार करण्याचा विषय आहे. भारतीय कायद्यात लिव्ह-इन रिलेशनशिपला सरसकट गुन्हा ठरवलेले नाही. मात्र प्रत्येक लिव्ह-इन नात्याला विवाहाचा दर्जा किंवा विवाहातील सर्व कायदेशीर अधिकार आपोआप मिळत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने काही विशिष्ट परिस्थितीत 'विवाहाच्या स्वरूपातील संबंध' मानल्या जाणाऱ्या नात्यांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षणाच्या कायद्यानुसार संरक्षण मिळू शकते, असे स्पष्ट केले आहे. त्यासाठी नात्याचा कालावधी, सामायिक घर, कौटुंबिक व्यवस्था, आर्थिक व्यवहार आणि दोघांचा नात्याबाबतचा हेतू अशा विविध बाबींचा विचार केला जातो.

म्हणूनच लिव्ह-इन नात्याकडे केवळ स्वातंत्र्याचा किंवा आधुनिकतेचा पर्याय म्हणून पाहणे पुरेसे नाही. कोणतेही नाते परस्परांचा आदर, विश्वास, समानता, जबाबदारी आणि संवादावर टिकते. विवाहसंस्थेतही मतभेद होतात, संघर्ष होतात आणि काही वेळा नाती तुटतात. त्यामुळे विवाहसंस्थेत समस्या नाहीत, असे म्हणता येणार नाही. मात्र त्याच कारणामुळे विवाहसंस्था निरुपयोगी ठरते, असेही म्हणता येणार नाही.

लिव्ह-इन असो किंवा विवाह, नात्यातील व्यक्तींनी एकमेकांच्या अधिकारांचा, स्वातंत्र्याचा आणि सुरक्षिततेचा आदर करणे आवश्यक आहे. नात्यात हिंसा, दबाव, फसवणूक किंवा शोषणाला कोणत्याही परिस्थितीत स्थान असू नये. कायदाही अशा परिस्थितीत संरक्षणाची तरतूद करतो. विवाह ही केवळ सामाजिक परंपरा नसून भारतीय समाजजीवनातील एक महत्त्वाची संस्था आहे. प्रेम, विश्वास, परस्पर सहकार्य, त्याग, तडजोड आणि जबाबदारी यांवर तिची उभारणी होते. त्यामुळे आधुनिक जीवनशैली स्वीकारताना परंपरेचा अंधानुकरणाने पुरस्कार किंवा विरोध करण्याऐवजी प्रत्येक नात्याच्या जबाबदाऱ्या आणि परिणामांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. लिव्ह-इन रिलेशनशिपचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तींवर सामाजिक टीका करणे हा उपाय नाही; त्याचप्रमाणे विवाहसंस्थेकडे कालबाह्य व्यवस्था म्हणून पाहणेही योग्य नाही. नात्याचे यश त्याच्या नावात नसून परस्पर आदर, विश्वास, समानता आणि जबाबदारीत असते. त्यामुळे लिव्ह-इन रिलेशनशिप हा काही व्यक्तींसाठी निवडीचा पर्याय असू शकतो; परंतु त्याला विवाहसंस्थेचा सार्वत्रिक पर्याय मानणे योग्य ठरणार नाही.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# जि.प. शाळेत दहावीतील प्रथम विद्यार्थिनीच्या हस्ते ध्वजारोहण

**दत्ता देशमुख**

जाफराबाद येथील पीएमश्री जिल्हा परिषदेत गेल्या चार ते पाच वर्षांपासून स्वातंत्र्यदिनानिमित त आगळावेगळा उपक्रम राबवला जात आहे. यात शाळेतील इयत्ता दहावीत प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. या वर्षीच्या ध्वजारोहणाचा मान धनंजय ढवळे यांची कन्या दिव्या ढवळे हिला मिळाला. तिने - इयत्ता दहावीत ९३ टक्के गुण घेऊन शाळेत प्रथम क्रमांक पटकावला होत गेल्या दहा वर्षांपासून वंदे मातरम ग्रुपच्या माध्यमातून पोलीस स्टेशनकडून रोख बक्षीस दिले जाते. या उपक्रमाला ११ वर्षे पूर्ण झाली



आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनातून शहरातील तीन विद्यार्थी उच्च पदावर गेले आहेत. यावर्षी व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष अमोल पडघन व गणेश पैठणकर यांच्या वतीने दिव्या ढवळे हिला आरोग्यविषयक वस्तूंची मेडिकल किट देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मनोज साळवे, उमेश दुनगहू, शालेय समितीचे अध्यक्ष शे. अकिल, मोहन मुळे, सुरेश वाकडे, एकनाथ घाटगे, अमोल पडघन, अनिल खंडेलवाल, धनंजय ढवळे, गणेश पैठणकर, कदीर पाशा, संजय खंडेलवाल, मुकेश भारद्वाज, धनंजय ढवळे, पठाण, शुभम लोखंडे, दिलीप बोबडे यांच्यासह शाळेचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेतून तीन कुटुंबांना सहा लाखांची मदत

**जालना - प्रतिनिधी**

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत विमाधारकांच्या निधनानंतर त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींना विमा दाव्याची रक्कम वितरित करण्यात आली. बँक ऑफ इंडिया, राजूर शाखा, ता. भोकरदन यांच्या वतीने तीन लाभार्थी कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये असे एकूण सहा लाख रुपयांच्या विमा दाव्यांचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते संबंधित नामनिर्देशित व्यक्ती चांदरी एक्को येथील श्रीमती जनाबाई ज्ञानेश्वर बेडके, ताडेगाव येथील श्री. राजू गोपाने तसेच खामखेडा येथील श्री. नारायण दामोदर यांना प्रत्येकी दोन लाख रुपयांच्या विमा दाव्याचे धनादेश वितरीत करण्यात आले. यावेळी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक मंगेश केदार, बँक ऑफ इंडियाचे राजूर शाखा व्यवस्थापक शाम अंभोरे, नोडल व्यवस्थापक अनिल ठोंबरे, प्रशासन अधिकारी बाबासाहेब औताडे आणि अधिकारी योगेश चोरमारे उपस्थित होते.

**जालना जिल्ह्यात सामाजिक सुरक्षा योजनांना प्रतिसाद**

जालना जिल्ह्यात केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजनांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत जिल्ह्यात ८.७३ लाख खाती उघडण्यात आली आहेत. या खात्यांमध्ये सुमारे ४०३ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत जिल्ह्यात ३.१० लाख नागरिकांची नोंदणी झाली असून, आतापर्यंत ५०० पेक्षा अधिक विमा दावे निकाली काढण्यात आले आहेत. या दाव्यांपोटी नामनिर्देशित व्यक्तींना एकूण १०.१२ कोटी रुपयांची विमा रक्कम वितरित करण्यात आली आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेलाही जिल्ह्यात प्रतिसाद मिळत असून, या योजनेअंतर्गत ६.४४ लाख नागरिकांची नोंदणी झाली आहे. आतापर्यंत ९५ दावे निकाली काढण्यात आले असून, त्यापोटी एकूण १.८९ कोटी रुपयांची विमा रक्कम वितरित करण्यात आली आहे. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत १८ ते ५० वर्षे वयोगटातील पात्र नागरिकांना वार्षिक ४३० रुपयांच्या हप्त्यात दोन लाख रुपयांचे जीवन विमा संरक्षण मिळते.

तर प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत १८ ते ७० वर्षे वयोगटातील नागरिकांना केवळ २० रुपये वार्षिक हप्त्यात अपघाती विमा संरक्षण उपलब्ध आहे.

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धा व आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचा उपक्रम!

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

ईद मिलादुन्नबीचे औचित्य साधून हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे सलग १३ व्या वर्षी उर्दू माध्यमाच्या शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आणि महाराष्ट्र व जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी दिली.

**राज्यस्तरीय उर्दू शिक्षक निबंध स्पर्धा**

''मोहब्बते रसूल (स.अ.) के अमली तक़ाज़े और हमारी गफलत''

अटी व स्वरूप: १००० ते १२०० शब्द (सुमारे ५ पाने). विजेत्यांना तीन रोख बक्षिसे, प्रमाणपत्र व ट्रॉफी दिली जाईल.

नियम: निबंध फक्त पोस्टानेच स्वीकारले जातील (हँड-टू-हँड स्वीकारले जाणार नाहीत).




**राज्य व जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार**

मराठी व उर्दू माध्यमातील सर्व व्यवस्थापनाच्या शिक्षकांसाठी एकूण १४ आदर्श शिक्षक पुरस्कार दिले जाणार आहेत: राज्यस्तर: मराठी माध्यम (३) व उर्दू माध्यम (३).

जिल्हास्तर (छत्रपती संभाजीनगर): मराठी माध्यम (मनपा-१, खाजगी-१, जि.प.-१) व उर्दू माध्यम (मनपा-१, खाजगी-१, जि.प.-विशेष पुरस्कार: क्रीडा शिक्षक (मराठी-१, उर्दू-१) आणि चित्रकला शिक्षक (मराठी-१, उर्दू-१).

प्रस्ताव व निबंध पाठवण्याचा पत्ता: वीनस फूट वेअर, शहीद भगतसिंग चौक, मेन रोड, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर ४३११११२. अंतिम मुदत: १२ सप्टेंबर २०२६ (शनिवार)

संपर्क: शेख अब्दुल रहीम (९६५७५२४५४५)

# पत्रकार संदीप पौनारकर यांच्या मातोश्रींचे निधन

**जालना - प्रतिनिधी**

दैनिक लोकमत समाचारचे जालना जिल्हा प्रतिनिधी संदीप वसंतराव पौनारकर यांच्या मातोश्री मीना वसंतराव पौनारकर (वय ७५, रा. बैतूल, मध्य प्रदेश) यांचे गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने नातेवाईक, मित्रपरिवार तसेच पत्रकारिता क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे.



मीना पौनारकर या अत्यंत धार्मिक, प्रेमळ, मनमिळाऊ आणि शांत स्वभावाच्या होत्या. आपल्या आपुलकीच्या वागणुकीने त्यांनी कुटुंबीयांसह परिचितांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते. प्रत्येकाशी जिव्हाळ्याने संवाद साधणे, सुख-दुःखात सहभागी होणे आणि कुटुंबाला प्रेमाने एकत्र बांधून ठेवणे, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष गुण होता. त्यामुळे त्या आपल्या परिचितांच्या वर्तुळात सर्वांना आपल्याशा वाटत. साधी राहणी, धार्मिक वृत्ती आणि माणुसकीचा जिव्हाळा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्या कुटुंबापुरत्याच मर्यादित न राहता आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि परिचितांच्या मनातही आपुलकीचे स्थान निर्माण करून होत्या.

यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी राजकीय, सामाजिक, साहित्यिक, वैद्यकीय, शैक्षणिक, पत्रकारिता तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सर्व थरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जाफराबाद तहसीलमध्ये तहसीलदार अविनाश लोढे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**दत्ता देशमुख**

जाफराबाद येथील सर्व शाळा, महाविद्यालये आणि विविध शासकीय तथा निमशासकीय कार्यालयांमध्ये स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील तहसील प्रांगणात पंचक्रोशीतील तमाम नागरिकांसह शहरातील विविध शासकीय तथा निमशासकीय कार्यालयांतील अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नागरिकांनी राष्ट्र ध्वजाला सलामी दिली. यावेळी तहसीलदार अविनाश लोढे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी पोलिस निरीक्षक सतीश जाधव, गट विकास अधिकारी बारगिरे, तालुका कृषी अधिकारी अमोल शिंदे, नायब तहसीलदार मंगेश साबळे, नगरसेवक



दिपक वाकडे, सुरेश गवळी, रविराज जैस्वाल, नगरसेवक अनिल बोर्डे, मंडळाधिकारी काळे,

**तहसीलच्या प्रांगणावर तहसीलदार लोढे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.**

मंडळाधिकारी पुष्पा सानप, लहाने, तलाठी अमोल मुरकुटे, अरुण पवार, जी. डब्ल्यू. भालके, विशाल दळवी, अंकुश सोनूने, भिमराज ब्राह्मणे, माधव साळवे, अक्षय येळवते, आर. आर. नागरे, तांगडे, फारूख कुरेशी, खंदारे यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी पासोडी येथील १७ सप्टेंबर १९९३ च्या लढ्यात मुरलीधर बैरागी यांनी आपल्या तरुण वयात स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य पत्करले. त्यांच्या वीर पत्नी गंगाबाई मुरलीधर बैरागी यांचा तहसील प्रांगणावर सत्कार करण्यात आला. यावेळी जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांसह विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. शहरातील न्यू हायस्कूल, ज्ञानसागर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, समर्थ विद्यालय, जि. प. प्रशाला, सिंहगड पब्लिक स्कूल यासह आदी शाळा-महाविद्यालयांच् या विद्यार्थ्यांची शहरातील विविध भागांत रॅली काढण्यात आली होती.

# विकासकाच्या नफेखोरीला चाप, रहिवाशांचा सुरक्षित घराचा हक्क श्रेष्ठः मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाने एका अत्यंत महत्त्वपूर्ण निकालात विकासकाच्या नफ्याच्या हक्कापेक्षा रहिवाशांच्या सुरक्षित आणि चांगल्या घरात राहण्याच्या हक्काला प्राधान्य दिले आहे. तब्बल १३ वर्षे पुनर्विकास प्रकल्पात एक वीटही न लावणाऱ्या विकासकाला कोणताही अंतरिम दिलासा देण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकसदस्यीय खंडपीठाने दिलेल्या या निर्णयामुळे विकासकांच्या मनमानीला कायदेशीर चाप बसला असून, वर्षानुवर्षे आपल्या हक्काच्या घराची वाट पाहणाऱ्या हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निकालाचे स्वागत करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी, ''हा निकाल म्हणजे सामान्य नागरिकांच्या हक्काचा विजय असून विकासकांच्या बेजबाबदार वृत्तीला मिळालेली कठोर कायदेशीर चपराक आहे,'' असे म्हटले आहे.

सदर प्रकरण मेसर्स पायनियर कन्स्ट्रक्शन्स विरुद्ध सहकारनगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड यांच्यातील असून, ते वाणिज्यिक लवाद याचिका (एल) क्रमांक १३९५६/२०२६ म्हणून न्यायालयात दाखल होते. मुंबईतील वडाळा येथील सुमारे ७० वर्षे जुन्या, ४६ इमारतींमध्ये राहणाऱ्या ८२० हून अधिक कुटुंबांच्या पुनर्विकासाचा हा प्रकल्प होता. या प्रकल्पासाठी २०१३ मध्ये विकासकाची नियुक्ती करण्यात आली होती, परंतु १३ वर्षे उलटूनही प्रकल्पात कोणतीही प्रगती झाली नाही. अखेरीस, रहिवाशांनी विकासकाशी केलेला करार रद्द करण्याचा निर्णय घेतला, ज्याला विकासकाने न्यायालयात आव्हान दिले होते.

न्यायालयासमोर झालेल्या सुनावणीत, न्यायमूर्ती मारणे यांनी विकासकाच्या कार्यपद्धतीवर तीव्र ताशेरे ओढले. न्यायालयाने नमूद केले की, १९५७ मध्ये बांधलेल्या जुन्या आणि धोकादायक इमारतींमध्ये ८२६ सदस्य जीव मुठीत धरून राहत आहेत. अशा परिस्थितीत, विकासकाचा नफा कमावण्याचा हक्क हा रहिवाशांच्या सुरक्षित घरात राहण्याच्या मूलभूत हक्कापेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही. विकासकाने केवळ १ कोटी रुपये अनामत रक्कम जमा करण्यापलीकडे प्रकल्पावर कोणताही खर्च केला नाही आणि १३ वर्षांच्या प्रदीर्घ काळात प्रकल्पाला सुरुवातही केली नाही. त्यामुळे, सोसायटीने करार रद्द करून नवीन विकासकाची नियुक्ती करण्याचा घेतलेला निर्णय योग्यच असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

या निकालावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः जालनासारख्या शहरांसाठी एक आदर्श आणि मार्गदर्शक (पान २ वर)

# सौ. संध्या संजय देठे यांची भाजपा महिला मोर्चा प्रदेश प्रतिनिधी पदी निवड

**जालना - प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा _मा. आमदार चित्राताई वाघ यांनी जालना जिल्हाध्यक्ष व जालना शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. संध्या संजय देठे यांची _प्रदेश प्रतिनिधी तथा परभणी जिल्हा प्रभारी म्हणून निवड केली आहे.

संघटनात्मक बांधणी व संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी त्यांच्याकडे परभणी जिल्ह्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बैठक, मंडळ गठीत व संघटन माहिती घेणे हे काम त्यांना पहावे लागणार आहे. सौ. संध्या देठे या गेल्या १० वर्षांपासून भारतीय जनता पार्टी महिला मोर्चामध्ये विविध पदांवर निस्वार्थपणे कार्यरत आहेत. त्यांच्या कामाची दखल घेऊन पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर ही महत्वाची जबाबदारी सोपवली आहे.

या निवडीबद्दल_ माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे ''दादा'' पाटील, माजी मंत्री आमदार बबनरावजी लोणीकर, आमदार तथा भारतीयजनता पार्टी जिल्हाप्रमुख नारायण भाऊ कुचे, आमदार संतोष भाऊ दानवे, माजी आमदार कैलास शेठ गोरंट्याल, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, संगीताताई गोरंट्याल, निर्मलाताई दानवेभाजपा गटनेते महेश निकम, नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांच्यासह भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी (पान २ वर)

# जालना शहरात भारतीय ज्ञान परंपरा व समृद्ध कीर्तन परंपरा याविषयी जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन

**दत्ता देशमुख**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० ऑगस्ट रोजी भारतीय ज्ञान परंपरा व समृद्ध कीर्तन परंपरा या विषयावर श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय जालना येथे जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ अश्विन रांजणीकर, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, छत्रपती संभाजीनगर हे असणार आहे तर उद्घाटक म्हणून ह भ प डॉ भगवान बाबा आनंदगडकर असणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री महेंद्र कुमारजी गुप्ता, अध्यक्ष श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय समिती, जालना व संस्थेचे कोषाध्यक्ष श्री संजयजी अग्रवाल यांची उपस्थिती असणार आहे. या चर्चासत्राचे बीजभाषण हभप डॉ न ब कदम हे करणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात हभप प्रा रामेश्वर नरवडे व संच यांच्या भजनाने होणार आहे तर सूत्रसंचालन हभप झगरे गुरूजी वाकदकर करतील. दुपारच्या सत्रामध्ये समृद्ध किर्तन परंपरेचा वर्तमान काळातील प्रभाव, उपयुक्तता व बदलते स्वरूप या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून या चर्चासत्राचे अध्यक्ष ह भ प डॉ अनिरुद्ध महाराज क्षीरसागर हे भूषवणार आहेत तर ह भ प डॉ प्रमोद महाराज कुमावत,हभप डॉ राम रौनेकर,हभप डॉ ऋषीबाबा शिंदे परिसंवादात आपले मनोगत मांडणार आहेत. कार्यक्रमाचा समारोप हभप प्रशांत महाराज जाधव व हभप भक्तीताई रणनवरे यांच्या सुश्राव्य पसायदानाने होईल. या सत्राचे सूत्रसंचालन हभप नारायण महाराज पिंपळे हे करणार आहेत.

जालना जिल्ह्यातील निमंत्रित कीर्तनकार, प्रवचनकार मंडळी व जिल्हातील मराठी विषयाचे प्राध्यापक या चर्चासत्रात सहभागी होणार आहेत अशी माहिती श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ विद्या पटवारी, डॉ जितेंद्र अहिरराव, प्र. प्राचार्य, श्रीमती पार्वती देशमुख, डॉ स्वाती महाजन, डॉ वासुदेव उगले यांनी दिली आहे.

# श्रीमती प्रभावतीदेवी भंडारी यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक स्व. ताराचंदजी भंडारी यांच्या धर्मपत्नी, विजय व जयेंद्र भंडारी यांच्या मातोश्री तसेच विक्रम, मयूर व अनुज भंडारी यांच्या आजी श्रीमती प्रभावतीदेवी भंडारी यांचे आज दुपारी २.३० वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने भंडारी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सामाजिक वर्तुळातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.



त्यांची अंत्ययात्रा उद्या सकाळी ११ वाजता त्यांच्या खासगी निवासस्थानाहून, हॉटेल मधुबनसमोरून निघणार आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक व आप्तेष्ट असा परिवार आहे.

# १२ व १३ डिसेंबर रोजी होणार; १२वे आंबाजोगाई साहित्य संमेलन

## संभाजीनगर येथील आंबाजोगाईकरांचा निर्धार

**जालना - प्रतिनिधी**



१२ व १३ डिसेंबर २६ शनिवार व रविवार रोजी १२ वे आंबाजोगाई साहित्य संमेलन संभाजीनगर येथील एम. आय. टी. परिसर, बीड बायपास रोड, संभाजीनगर या ठिकाणी भव्य स्वरूपात करण्याचा निर्णय १६ ऑगस्ट रोजी झालेल्या स्वागत सभासदांच्या बैठकीत करण्यात आला. अध्यक्षस्थानी स्वागताध्यक्ष शकुंतला लोमटे होत्या.

**वृक्षारोपणाने नांदी**

एम. आय. टी. परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून संमेलनाची नांदी केली जाईल. अंबाजोगाईच्या लेखकांच्या पुस्तकांचे मुखपृष्ठ दुतर्फा लावले जाणार आहेत. शिवाय सेल्फी सेंटर ह या संमेलनाचे मुख्य आकर्षण असेल.

**दोन कवी संमेलन**

या संमेलनात एक निमंत्रितांचे व एक खुले कविसंमेलन होईल. संमेलन अध्यक्ष इंदुताई जोंधळे यांची मुलाखत घेण्यात येईल. तसेच आंबाजोगाई काल, आज आणि उद्या या विषयावर आगळा वेगळा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. उदघाट्न व समारोप सत्रात मान्यवर वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.

**सांस्कृतिक कार्यक्रमाचे वेगळेपण-**

सांस्कृतिक कार्यक्रमात आंबाजोगाईच्या दिग्गज व उदयोन्मुख कलावंतांच्या प्रतिभेची झलक पहायला मिळेल. संभाजीनगर येथे राहणाऱ्या मुलांना रॅप, स्टॅन्डअप कॉमेडी अशा विविध प्रकारच्या आधुनिक कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.

**नव्या जुन्यांचे चित्र प्रदर्शन**

या साहित्य संमेलनात चित्र परदर्शन भरवले जाणार, यात आंबाजोगाईच्या कलावंतांच्या महत्वपूर्ण कलाकृती बरोबरच (पान २ वर)

# उर्दू माध्यमातील शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा व आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रितः हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचा उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

ईद-ए-मिलादुन्नबीचे औचित्य साधून हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे सलग १३ व्या वर्षी उर्दू माध्यमाच्या शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा, तसेच महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांसाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे माजी संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी दिली.





**राज्यस्तरीय उर्दू शिक्षक निबंध स्पर्धा**

या स्पर्धेचा विषय ''मोहब्बते रसूल (स.अ.) के अमली तक़ाज़े और हमारी गफलत'' हा असून, त्यावर १००० ते १२०० शब्दांत (सुमारे ५ पाने) निबंध लिहून पाठवायचा आहे. विजेत्यांना तीन रोख पारितोषिके, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह (ट्रॉफी) देऊन गौरवले जाईल. निबंध फक्त पोस्टाने किंवा कुरिअरनेच स्वीकारले जातील (प्रत्यक्ष/हँड-टू-हँड स्वीकारले जाणार नाहीत). सर्व शिक्षकांनी निबंध स्वतःच्या हस्तक्षरातच लिहिणे अनिवार्य असून, संगणकावर टाइप केलेले () निबंध स्पर्धेत ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**राज्य व जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार**

राज्यातील मराठी व उर्दू माध्यमातील सर्व व्यवस्थापनांच्या शिक्षकांसाठी एकूण १४ आदर्श शिक्षक पुरस्कार दिले जाणार आहेत. राज्यस्तरावर मराठी माध्यम (३) व उर्दू माध्यम (३), जिल्हास्तरावर (छत्रपती संभाजीनगर): मराठी माध्यम (मनपा-१, खाजगी-१, जि.प.-१) व उर्दू माध्यम (मनपा-१, खाजगी-१, जि.प.-१), विशेष पुरस्कारः क्रीडा शिक्षक (मराठी-१, उर्दू-१) आणि चित्रकला शिक्षक (मराठी-१, उर्दू-१). प्रस्ताव व निबंध पाठवण्याचा (पान २ वर)

# जालना दौऱ्यावर आलेल्या राजेंद्र पवार यांचा वीज तांत्रिक कामगार संघटनेतर्फे सत्कार




**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटना १७०१च्या जालना टीमच्या वतीने मा. श्री. राजेंद्रजी पवार साहेब, संचालक यांचा सत्कार करण्यात आला. दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सुरक्षा साहित्य वाटप तसेच विविध महत्त्वाच्या बैठकीसाठी ते जालना येथे आले होते.

यावेळी संघटनेच्या पदाधिकारी व सभासदांनी पुष्पगुच्छ देऊन राजेंद्रजी पवार साहेब यांचा सत्कार केला. याप्रसंगी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या सुरक्षेसोबतच ग्राहकांच्या सुरक्षेलाही प्राधान्य दिले पाहिजे, असे सांगितले. वीज काम करताना सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून, आवश्यक सुरक्षा साधनांशिवाय कोणत्याही परिस्थितीत काम करू नये. तसेच आपल्या सहकाऱ्यांनाही सुरक्षा साधनांशिवाय काम करू देऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

# विक्रमी व साहसी सायकलिंग केल्याबद्दल जवाहर काबरा यांचा माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केला सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील जेईएस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.जवाहर काबरा यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी सायकलिंग व मोठे साहस करून तरुणांनाही लाजवेल अशा उत्साहात युथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडियाद्वारे आयोजित केलेल्या लेह उमलिंगला पास सायकल एक्सपीडिशन मध्ये सहभागी होऊन तब्बल १९०२४ फूट उंचीवर डोंगररांगा सायकल वरून पार करण्याचा विक्रम केला. त्यांच्या या साहसी प्रवासाबद्दल शहराचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी त्यांची भेट घेऊन मनः



पूर्वक अभिनंदन केले. प्राचार्य काबरा हे विद्यार्थी दशेतही अत्यंत उत्कृष्ट विद्यार्थी संघटक होते. तसेच सामाजिक उपक्रमातही त्यांचा सहभाग असायचा. त्यांनी रक्तदान करणारा एक मोठा गट उभा केला होता. जेईएस महाविद्यालयात विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून आपली ओळख निर्माण केली. तसेच त्याच महाविद्यालयात पुढे उत्कृष्ट प्राचार्य म्हणून छाप पाडली. आता सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांनी सायकल वरचा अत्यंत खडतर प्रवास करून मोठा विक्रम केला आहे. ३६५ किलोमीटरचा दुर्गम प्रवास त्यांनी सायकल वरून पूर्ण केला. लेह पासून सुरू झालेला हा प्रवास शारा, चुमाथांग, (पान २ वर)

# जिल्हा परिषद उपकर योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

कृषी विभाग जिल्हा परिषद मार्फत जिल्हा परिषद उपकर योजना सन २०२६-२७ अंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदान तत्त्वावर पुरविण्यासाठी महत्तम अनुदान मर्यादेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे कृषी औजरासाठी तालुकास्तरावर प्राप्त होणाऱ्या अर्जातील शेतकऱ्यांची जिल्हास्तरावर संगणकीय लॉटरी पध्दतीने निवड करण्यात येणार आहे. जिल्हा परीषद उपकर योजना सन २०२६-२७ मधील औजरांवर खालीलप्रमाणे अनुदान देय आहे.

ट्रॅक्टर (२० .... व त्यापुढील)- किंमतीच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु.१ लाख २५ हजार च्या मर्यादेत (यापैकी जी कमी असेल ती), ट्रॅक्टरचलीत रोटाव्हेटर किंमतीच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु. ३६ हजार ८०० च्या मर्यादेत (यापैकी जी कमी असेल ती), मानवचलीत टोकन यंत्र किंमतीच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. ८ हजार च्या मर्यादेत स्ट्रॉ चॉपर/श्रेडर/मल्चर माऊंटेड किंमतीच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु. ५८ हजार च्या मर्यादेत (यापैकी जी कमी असेल ती) योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे : लाभार्थीजवळ स्वतःच्या नावे जमिनीचा (पान २ वर)

# डाक जीवन विमा (PLI) व ग्रामीण डाक जीवन विमा (IULLI) चा विस्तार

## करण्यासाठी डाक विभागाकडून इतर विभागीय कर्मचारी' नवीन एजंट श्रेणीची सुरुवात

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध आस्थापनांमध्ये डाक जीवन विमा () तसेच सामील एक विमा () यांचा प्रसार व व्याप्ती अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने चार विभागाने इतर विभागीय कर्मचारी ( ही नवीन एजेंट वेणी सुरु केली आहे. ही योजना १ जुलै २०२६ पासून प्रभावी झाली आहे.

योजनेची ठळक वैशिष्ट्येः

पात्रताः डाक विभागातील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त, वेतन मॅट्रिक्समधील लेव्हल ८ पर्यंतच्या पदावर कार्यरत असलेला कोणताही का अथवा राज्य शासनाचा कर्मचारी म्हणून नोंदणी करण्यास पात्र असेल. नियुक्तीचे स्वरूपः म्हणून कार्य करणे पूर्णतः ऐच्छिक असेल. तसेच, आणि डाक विभाग यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे नियोक्ता-कर्मचारी संबंध निर्माण होणार नाहीत.

कामकाजाची वेळः विमा व्यवसाय मिळविण्याचे कार्य संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या अधिकृत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेव्यतिरिक्त करणे आवश्यक आहे.

आवश्यक पूर्वअटीः अर्जदाराने आपल्या मूळ विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र () अथवा आवश्यक परवानगी प्राप्त करणे बंधनकारक आहे.

प्रशासकीय मार्गदर्शनः यांना विकास अधिकारी () यांच्याशी संलग्न करण्यात येईल. विकास अधिकारी त्यांना आवश्यक मार्गदर्शन, परिचयात्मक माहिती, प्रशिक्षण तसेच कामकाजासाठी आवश्यक कार्यात्मक सहाय्य प्रदान करतील.

प्रोत्साहनाची रचनाः यांना व्यवसाय मिळविण्यासाठी तसेच नूतनीकरणासाठी (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरसंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.